अकृषि विदयापीठे तसेच संलग्नित मान्यता प्राप्त शासकीय अनुदानित महाविदयालये / तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविदयालये /तंत्रनिकेतने/औदयोगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षणाकडील अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविदयालये तसेच सेवानिवृत्ती वेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विदयापीठे यांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : अनियो २०१०/(६७८/१०)/विशि-१**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ००३२.**
**दिनांक :- १२ मार्च, २०१३**

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक :- अनियो २०१०/(६७८/१०)/विशि-१, दिनांक- २५-०३-२०११.**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक :- अनियो २०१०/(६७८/१०)/विशि-१, दिनांक- २९-१०-२०१२.**

## परिपत्रक

सदर प्रकरणी मा.मुख्यसचिव,अपर मुख्यसचिव (उ.व तं.शि), प्रधान सचिव (वित्त विभाग) यांच्या समवेत सर्व विभाग प्रमुखांच्या दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी अकृषि विदयापीठे तसेच संलग्नित अनुदानित अशासकीय महाविदयालयांच्या सेवेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना नीवन "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू करण्याच्या कार्यपध्दतीबाबत चर्चा झाली, त्या वेळी असे निदर्शनास आले की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विदयापीठे तसेच, संचालक, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण, संचालनालयातील आणि शासकीय अनुदानित अभिमत विदयापीठे यांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना सन नोव्हेंबर, २००५ पासून लागू करण्यात आली आहे. यासंदर्भात शासनाच्या दिनांक २५-०३-२०११ आणि २९-१०-२०१२ च्या आदेशानुसार सर्व संबंधीतांना आवश्यकती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वरील सर्व शिक्षण संस्थांमध्ये सन २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना अदयाप पर्यंत नविन "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू करण्यासाठी आवश्यक असलेले खाते क्रमांक देण्यात आलेले नाही. त्यामुळे यासंदर्भात सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांची अंशदान वसूली करण्यात आली नसल्याचे संबंधीत उपस्थित अधिकाऱ्यांनी बैठकीच्या वेळी स्पष्ट केले.

यास्तव, आता या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषि विदयापीठे व संचालनालयाच्या तसेच, शासन अनुदानित अभिमत विदयापीठाच्या आस्थापनेवर नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या परंतु, ज्यांना अदयाप पर्यंत खाते क्रमांक देण्यात आले नाहीत. अशा कर्माचाऱ्याकडून अंशदानाची वसूली करण्यास अडचणी येणार आहेत. त्यामुळे यासंदर्भात सर्व संबंधीत संचालक, (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / व्यवसाय शिक्षण) सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / व्यवसाय शिक्षण) सर्व शासन अभिमत विदयापीठे तसेच, सर्व संचालनालयातील आहरण व संवितरण

अधिकारी यांनी त्यांच्या आस्थापनेवरील सन २००५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले खाते क्रमांक तात्काळ देऊन, अशा सन २००५ नंतर नियुक्त झालेल्या सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या मासिक वेतनातून फेब्रुवारी / मार्च २०१३ पासून वसूली करणे आवश्यक राहणार आहे. यासाठी सर्व संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांना शासनाच्या उपरोक्त आदेशातील निर्देशानुसार आवश्यकते खाते क्रमांक देऊन, त्याप्रमाणे तात्काळ वसूली सूरु करण्याचे निर्देश दिनांक ०५-०२-२०१३ तसेच दिनांक ११/०२/२०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीच्या वेळी देण्यात आले आहे. त्याप्रमाणे, यासंदर्भात सर्व संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी फेब्रुवारी/मार्च २०१३ अखेरपर्यंत आवश्यकती कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पुनश्च सुचना देण्यात येत आहे. जर सदर कार्यवाही विहित मुदतीत करण्यात आली नाही, तर अशा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे एप्रिल २०१३ चे वेतन थांबविण्याबाबतचे निर्देश संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात येईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०१३०३१३१५४३४३२६०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

(रा.गो.जाधव)
शासनाचे सहसचिव

---

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र

(संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९११३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीके/ 39 दिनांक 21 JUN 2013

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,